## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि ०४ ऑगस्ट २०२३

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५१७/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २/०८/२०२३ रोजी २०.०० वा. उत्तर सदर बझार कामाटीपुरा सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०८/२०२३ रोजी ०६.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चंद्रकांत विजयसिंग बडुरवाले,वय-२९ वर्षे,रा- ८५६/८६१,उत्तर सदर बझार कामाटीपुरा सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अमर परदेशी,२) रितेश बडुरवाले, ३) शुभम बडुरवाले,४) सोनाबाई बडुरवाले,सर्व रा-सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ची वहिणी सोनाबाई हिच्यावर शेजारी राहणारी आरोपी क्र ४ हिने वहिनीवर चारित्र्यावर संशय घेऊन विनाकारण शिवीगाळ करीत असताना त्यांचा जाब विचारण्यासाठी गेले असता यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी दगडाने व लाथाबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करून फिर्यादी व भाऊ सुरेश दोघांना मारहाण केले व आरोपी क्र १ याने फिर्यादीस दगडाने डोक्यावर व डोळयाजवळ मारहाण करून जखमी केले आहे.म्हणून. तपास:- पोह/९८७/कंचे-८३७८९८०९८७ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४३३/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | डिसेंबर २०२२ ते आजतागायत पर्यत फिर्यादीचे सासरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०८/२०२३ रोजी ०४.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | खतीजा बिलाल दंडोती,वय-२१,रा- साईनाथ नगर भाग-२ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) बिलाल दंडोती (पती),२) शमा अ.रऊफ दंडोती (सासू),३) अय्युब शेख (पतीचे मामा),४) सना मोसीन शेख (नणंद), ५) जहरा अस्लम शेख (नणंद),सर्व रा शोभादेवी नगर नई जिंदगी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे पती हे स्वत:चा व्यवसाय करायचा आहे तु माहेरून ५ लाख रूपये घेवून ये नाहीतर तुला नांदविणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करणे ,हातपाय दोरीने बांधून मारहाण करणे, असे करत आरोपी क्र ३ व ४ यांच्या सांगण्यावरून फिर्यादीस माराहाण करीत असे आरोपी क्र ३ हे फिर्यादीचे घरी येऊन आरोपी क्र १ व २ यांना फिर्यादीबाबत तेरी बीबी अच्छी नही है उसकी चाल चलन अच्छा नही है तुझ्याशी आमच्या मुलाचे लग्न करून आम्हाला पश्चाताप होत आहे.आम्ही जर मुलाचे लग्न श्रीमंत मुलीशी लावून दिले असते तर आम्हाला भरपुर हुंडा व सोने मिळाले असते तुझ्या माहेरचे भिकारी आहेत,ते आमच्या लायकीचे नाही असे बोलत,आरोपी क्र ५ ही फिर्यादीचे घराशेजारी राहत असल्याने ती फिर्यादीस घरी येवून तुला स्वयंपाक येत नाही,कपडे धुता येत नाही असे म्हणून फिर्यादीस मारून शिवीगाळ करीत असत,आरोपी क्र ४ ही माहेरी आल्यावर तिचे व तिच्या पतीचे व मुलीचे कपडे का धुतले नाही या कारणावरून फिर्यादीस मारहाण करत असत व सासरी गेल्यावर सासूचे मोबाईल वर फोन करून फिर्यादीस जेवण देऊ नको सगळी काम करून घे बाहेर जाताना कुलुप लावून जात जा असे म्हणून सांगत असे व फिर्यादीची सासू ही फिर्यादीस जेवण न देता उपाशी ठेवून बाहेर जाताना घराला कुलुप लावून जात असत.म्हणून. तपास:- पोह/११९५/बर्हिजे-८३७८९८०९८७ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५१९/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २/०८/२०२३ रोजी २२.०० वा. सुधीर मन्सावाले यांच्या घरी, उत्तर सदर बझार सोलापूरसोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०८/२०२३ रोजी २०.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विजयसिंग मनोसिंग हजारीवाले,वय-५६ वर्षे,रा- ७३,उत्तर सदर बझार १४ नंबर शाळेजवळ लोधी गल्ली सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सुधीर मन्सावाले,२) रवी मन्सावाले,३) राजू मन्सावाले,४) सिताराम मन्सावाले,सर्व रा- लोधी गल्ली सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०२/०८/२०२३ रोजी २२.०० वा चे सुमारास यातील फिर्यादी हे आरोपी क्र १ यांच्या घरी आमचे उरलेले भिशीचे पैसे मागण्यासाठी गेले असता त्याचा राग येवून आरोपी क्र १ ते ४ यांनी मिळून फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केले व फिर्यादीचा मुलगा रोहित याला आरोपी क्र ३ यांने भाजी कापण्याच्या चाकुने पाठीवर वार करून जखमी करण्यास कारणीभूत झाला आहे.म्हणून. तपास:- पोह/४२१/इनामदार-८६०५०१०१४१ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४८०/२०२३ भादवि ४२०,४१७,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि१/०७/२०२१ ते दि ०३/०९/२०२२ दरम्यान लोकमंगल हाऊस ८५३६/ए/११,मुरारजी पेठ जुना पुना नाका जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०८/२०२३ रोजी २३.३३ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रशांत प्रभाकर पाटील,वय-५२ वर्षे,व्यवसाय- संचालक लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज ली, रा-लोकमंगल हाऊस ८५३६/ए/११,मुरारजी पेठ जुना पुना नाका जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.दिपक बाळासाहेब राठोड,रा- बीटरगाव तांडा,ता रेणापुर जि लातूर,२) रावसाहेब बाबु आडे,रा- राडीतांडा पो.रांडी ता.अंबेजोगाई जि बीड,३) कलीम बहाद्दुर शहा रा- जहॉगीर मोहा ता.धारूर जि.बीड,४) बाळासाहेब सिद्राम राठोड,रा-बीटरगाव,५) अमरसिंह क्षीरसागर रा-काटेवाडी,ता.मोहोळ जि.सोलापूर,६) अरविंद दिगंबर भारती,रा-काटगाव जि लातूर ७) इतर ठेकेदार व शिफारस करणारे अधिकारी. |
| **फसवणूक रक्कम** | | ४६,१३,७५२/- रूपये. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०१/०७/२०२१ ते दि ०३/०९/२०२२ च्या दरम्यान नमुद ठिकाणी १) लोकमंगल शुर ईथेनॉल ॲण्ड को जनरेशन इंडस्ट्रिज लि.भंडारकवटे ता.दक्षिण सोलापूर,२) लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रिज जि.बीबीदारुफळ ता.उ.सोलापूर,३) लोकमंगल माऊली इंडस्ट्रिज ता.लोहारा जि उस्मानाबाद या कारखान्यासाठी गळीत हंगाम सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या हंगामामध्ये कारखान्यासोबत ठेकेदार व त्यांना शिफारस करणारे अधिकारी यांनी संगनमत करून ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणेचा पुरवठा करण्याचा करार करून कारखान्याकडून बॅकेव्दारे अदा केलेली ॲडव्हान्स व भंडार साहित्यपोटी रक्कम ६२,१५,४४०/-रू घेवून ऊस तोडणी व वाहतुक यंत्रणेचा पुरवठा केलेले नाही तसेच वारंवार मागणी करून देखील ॲडव्हान्स म्हणून घेतलेली रक्कम ही परत केलेली नाही.<br>आरोपी क्र १ ते ७ यांनी केलेली कामाची रक्कम व जमा केलेली रक्कम असे मिळून १६,०१,६८८/- रूपये वजा करीत एकूण ४६,१३,७५२/- रू ची संगनमत करून फसवणूक केलेली आहे.म्हणून. तपास:- पोनि देशमुख-**९४२१०८५८८८** |